क्रमांक : ७८

## महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

### मंगळवार, दिनांक १९ मे, २०२६/वैशाख २९, शके १९४८

७८. सर्व सन्माननीय सदस्यांना याद्वारे कळविण्यात येते की, सन्माननीय विधानसभा सदस्य श्री. नारायण पाटील यांनी सन २०२५ च्या हिवाळी अधिवेशनाच्या कामकाजाकरीता नागपूर येथे उपस्थित असताना सन्माननीय सदस्य प्रतिनिधीत्व करीत असलेल्या करमाळा तालुक्यातील तातडीच्या प्रशासकीय कामानिमित्त दिनांक ९ डिसेंबर, २०२५ रोजी श्रीमती शिल्पा ठोकडे, तहसीलदार, करमाळा यांना वारंवार फोन केला असता त्यांनी त्यांचा फोन उचलला नाही तसेच त्यांना कोणताही प्रतिसाद दिला नसल्याने सन्माननीय विधानसभा सदस्य श्री. नारायण पाटील यांनी श्रीमती शिल्पा ठोकडे, तहसीलदार, करमाळा यांच्याविरुध्द दिनांक ९ डिसेंबर, २०२५ रोजी दिलेली विशेषाधिकार भंग व अवमानाची सूचना मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम २८४ मधील तरतूदींच्या अधीनतेने स्वेच्छानिर्णयाने विधानसभा विशेषाधिकार समितीकडे तपासणीसाठी व अहवाल सादर करण्यासाठी दिनांक १५ मे, २०२६ रोजी सुपूर्द केली आहे.

---

**विधान भवन,**
मुंबई.
दिनांक : १९ मे, २०२६

**जितेंद्र भोळे,**
सचिव -१.
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**याची प्रत :**

१) महाराष्ट्र विधानसभेचे सर्व मा.सदस्य.
२) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव
३) मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
४) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालय
५) संगणक कक्ष
६) MKCL कक्ष